| नियमीत दिवाणी मुकदमा क्र.८/२०२५ निशाणी १४ वरील आदेश<br>भिकाजी सखाराम पंडित<br>वि.<br>रामचंद्र गोपाळ आदारी व इतर | MHKO140000292025 |
|---|---|

सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की,** प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकीद मनाईकरिता व नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी हे स्वत: प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये घुसून बेकायदेशीर बांधकाम करत असुन प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये त्यांच्या मिळकतीच्या हद्दीवरुन वाद आहे आणि वादीने प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन नवीन घराचे बांधकाम करत आहे. वादी, प्रतिवादी यांच्यामधील वाद सरकारी मोजणी आणुन संपुष्टात आणता येणार आहे. वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीची सद्यस्थिती काय आहे. प्रतिवादीचे नवीन घराच्या बांधकामाची आजची स्थिती काय आहे इत्यादी बाबी न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादाचे निराकरण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे उपयुक्त ठरणार आहे. प्रतिवादी कोणताही पुरावा जमा करण्याचा प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने सविस्तर निशाणी क्र.१८ वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जातील संपुर्ण कथने नाकारली आहेत. वादीने असे कथन केले आहे की, दाव्याच्या सद्यस्थितीत प्रस्तुत अर्ज करता येणार नाही. अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये पात्र दिसून येत नाही. सदरचा आदेश केवळ पुरावा तयार करण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. पी. देवाण व वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. कांबळे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे सविस्तरपणे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने केवळ कायम मनाई ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. वादीतर्फे दाखल केलेल्या छायाचित्रावरुन दावा मिळकतीची वस्तु:स्थिती अभिलेखावर आलेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीचा वस्तुनिष्ठ अहवाल अभिलेखावर येणे सद्यस्थितीत आवश्यक दिसून येत नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये अद्याप तुर्तातुर्त मनाई अर्ज निकाली झालेला नाही. अशा परिस्थीतीत अर्ज मंजुर केल्यास वादीस पुरावे गोळा करण्यास अप्रत्यक्षपणे कोर्टाने मदत करणेसारखे होईल. न्याय तत्वानुसार पुरावा गोळा करण्यासाठी तसेच केवळ कायम मनाई हुकूमाच्या दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करता येत नाही. केवळ वादी व प्रतिवादी यांच्या कथनांमध्ये विरोधाभास असल्यामुळे अशा बाबी शाबीतीकरीता न्यायालीन आयुक्ताची नेमणुक करता येत नाही. सदर दाव्यामध्ये दावा मिळकतीवर वादीची कब्जेवहिवाट आहे व प्रतिवादीने वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे. सदर बाबी शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी वादीवर आहे. सदर अर्जाची गुणवत्ता, दाव्याचे स्वरुप व दाव्यातील मागणी पाहता न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे उचित दिसून येत नाही. सबब, अर्ज नामंजूर होणेस पात्र ठरत आहे. येणेप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी यांचा निशाणी क्र.१४ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |
| ३. | प्रकरण निशाणी क्र.५ चे सुनावणीकामी लावण्यात यावे. |

| | |
|---|---|
| | **(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखित व घोषीत करण्यात आला.)** |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.07.14 17:38:10 +0530

(ए.एन.सरक )

दिनांक – १४/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चंदगड.